# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/12/2022 (शुक्रवार) सकाळ

### चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील नांदगाव येथे दिनांक २०/१२/२०२२ चे ११.०० वा. पुर्वी फिर्यादी नामे– सागर गुप्ता वाघमारे, वय २७ वर्ष, रा. नविन नांदा कोराडी यांना डुमरी गावातील लोकांनी फोन करून सांगीतले की नांदगाव ते डुमरी गावातील बंद पडलेल्या पोल वरील ॲल्यूमिनीअमचे तार तूटलेले आहे यावरून गोंडेगाव विदयूत केंद्रावरील स्टाफ सोबत जावून नांदगाव येथे पाहणी केली असता विजेचे तार तूटलेले दिसले असून नांदगाव ते डुमरी येथील शिवारातील लावलेले पोल वरील ५५ एम. एम. ॲल्यूमिनीयम १९८० मिटर तार किंमती अंदाजे १५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मेश्राम मो. नं. ९०६७१७६६९४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा निमजी येथे दिनांक २६/११/२०२२ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– संजय लोटु पाटील, वय ४८ वर्ष, रा. बोढाळा ता. जि. नागपुर यांच्या हायवे रोडवरील सोलार कंपनीच्या लोखंडी प्लेटा किंमती अंदाजे १६०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार बं. नं.१०४ मन्नान नवरंगाबादे, मो. नं. ९४२३६०४८२८ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा देवलापार रामटेकडी येथे दिनांक १६/१२/२०२२ ते दि. २१/१२/२०२२ चे १५.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— बसप्पा हणमंता सावळगी, वय ४२ वर्ष, रा. सांगली ह. मु. टिळक वार्ड रामटेक हे भारत ईलेक्ट्रीकल कॉट्रॅक्टर ॲन्ड मॅन्युफॅक्चरींग कंपनी प्रायवेट लिमीटेडचे साईड इंचार्ज म्हणून काम करत असून त्यांनी एम. एस. ई. बी. कंपनीकडून कॉट्रॅक्ट बेसीकवर विदयुत तार जोडणीचा ठेका घेतलेला असून नमुद घटना वेळी व ठिकाणी पोलला लावलेले १) ३०० मीटर विदयुत तार किंमती अंदाजे २००००/— रू. २) विदयुत तार सोबत असलेले डिस्क इन्सवेटर/हार्डवेअर किंमती अंदाजे ५०००/—रू. असा एकुण किंमती अंदाजे २५०००/—रूपयाचा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक संदीप नागोसे ब. नं. १९७४ पोस्टे. देवलापार मो. क्र. ७९७२२१२१३२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**